RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
# शिव वाणी

## गणपत बनसोडे यांच्या निधनाने सच्चा कार्यकर्ता गमावला ना. पंकजाताई मुंडेंनी व्यक्त केल्या शोक भावना

प्रतिनिधी @ परळी

भाजपचे नागापूर येथील ज्येष्ठ कार्यकर्ते गणपत बनसोडे यांच्या निधनाने आपण सच्चा व अनुभवी कार्यकर्ता गमावला आहे अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोक भावना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.गणपत बनसोडे यांच्या निधनाचे वृत्त समजताच ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांचा मुलगा यशपाल बनसोडे व बनसोडे कुटुंबियांचे दूरध्वनीवरून सांत्वन केले. वैद्यनाथ साखर कारखान्याचे संचालक पद भूषविलेले गणपत बनसोडे हे भाजपचे एक निष्ठावंत व सच्चे कार्यकर्ते होते. ते जिल्हा मध्यवर्ती बँकेचे देखील संचालक होते. एक मनमिळावू, अनुभवी व सर्वांच्या मदतीला धावून येणारे अशी त्यांची ख्याती होती. ते आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते होते, त्यांच्या निधनाने आपल्याला दुःख झाले आहे, अशा शब्दांत शोक व्यक्त करत ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक १८ | सोमवार दि.१२ मे २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -18 | MONDAY DT.12 MAY 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES

# जिल्हा रुग्णालयाबाहेरच रुग्णाचा गळफास, सुरक्षारक्षकांच्या कार्यतत्परतेमुळे जीव वाचला

बीड : उपचारासाठी आलेल्या एका रुग्णाने अपघात विभागाच्या समोरील झाडाला रुमालाने गळफास घेतला. लटकताच खिशातील मोबाइल खाली पडला अन् लोकांनी आरडाओरडा केला. त्यानंतर सुरक्षा रक्षक धावले आणि झाडावर चढून त्याला वाचविले. त्यानंतर अपघात विभागात दाखल करून उपचार केले. हा प्रकार शुक्रवारी दुपारी ४ वाजता जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात घडला. गळफास घेण्याचे कारण मात्र, समजू शकले नाही.

नामदेव रगडे (अंदाजे वय ४०, रा. वांगी, ता. बीड) असे या रुग्णाचे नाव आहे. नामदेव हे शुक्रवारी दुपारी जिल्हा रुग्णालयात आले. अपघात विभागासमोरच जुने वडाचे झाड आहे. त्या ठिकाणी ते काही वेळ थांबले. याच झाडाखाली रुग्णांचे नातेवाईक जेवण करतात. तसेच सावली असल्याने गप्पा मारत असतात. त्यामुळे येथे कायम गर्दी असते. ही गर्दी कमी होताच नामदेव यांनी संरक्षक भिंतीच्या बाजूने झाडावर चढले. आपल्या गळ्यातील भगवा रूमाल फांदीला बांधला. फांद्यामुळे ते कोणाला दिसले नाही. त्यानंतर गळफास लावून लटकताच ते थोडे आडवे झाले आणि वरच्या खिशातील मोबाइल खाली पडला. बाजूच्या लोकांनी जाऊन पाहिल्यावर आरडाओरडा केला. त्यानंतर तेथील सुरक्षा रक्षक धावले आणि झाडावर चढून त्यांना अलगद वर उचलले. इतर लोकांनी मदत करून गळ्याचा फास काढत त्यांना खाली उतरवत अपघात विभागात दाखल केले. त्यांच्यावर अपघात विभागातच उपचार सुरू

### सीएस, एसीएसचीही धाव

गळफासाची माहिती समजताच ऑनलाइन बैठकीत असलेले जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संतोष शहाणे, डॉ. एल.आर. तांदळे, डॉ. हनुमंत पारखे यांनी धाव घेतली. अपघात विभागातील डॉक्टरांच्या मदतीने त्यांच्यावर उपचार केले. त्यामुळे रगडे यांना जीवदान मिळाले. काही वेळ अपघात विभागातच उपचार केल्यानंतर आयसीयू विभागात दाखल करू, असे आरोग्य विभागाने सांगितले.



देशाच्या एकतेसाठी आणि जवानांच्या सन्मानार्थ अँड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या

## वाढदिवसा निमित्त पाटोद्यात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भव्य तिरंगा रॅली




प्रतिनिधी @ पाटोदा

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस यंदा थाटामाटात न साजरा करता, भारताच्या एकतेचा संदेश देण्यासाठी व देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या वीर जवानांच्या सन्मानार्थ पाटोदा येथे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.ही रॅली दिनांक ११ मे २०२५ रोजी पाटोद्याच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरू होऊन डॉ. बाबासाहेब

(उर्वरीत पान २ वर)

## दहशत, गुन्हे करणाऱ्या टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई

प्रतिनिधी @ परळी

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबादित राखण्यासाठी बीड जिल्ह्याचे पोलीस अधोक्षक नवनीत कॉवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. बीड जिल्हयातील गुन्हेगारीचे व गुंडगिरीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून चउजउ- व चझऊ- व कलम ५५,५६,५७ मपोका अन्वये बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचा धडाका बीड जिल्हाचे पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली बीड पोलीसांनी सुरु ठेवला आहे.

जनतेच्या जिविताचे व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी जिल्हयात चोऱ्या, दरोडे, घरफोड्या, खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडयाची तयारी, बलात्कार, जुलुमाने घेणे, पळवून नेणे, खंडणी मागणे या व अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द ठोस कारवाई करण्यासाठी बीड जिल्हयातील पोलीस जिल्हयातील व जिल्हाचे बाहेरील गुन्हेगारावर करडी नजर ठेऊन आहेत.दिनांक ०१/०३/२०२५ रोजी न्यायालयाचे आदेशान्वये पो.स्टे. परळी शहर गुरनं ४४/२०२५ कलम ३०७, ३२६,३९२, ३९४,३२३, ३२४, ५०४,५०६,३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्हयातील फिर्यादी सहदेव वाल्मीक सातभाई वय २८ वर्षे व्यवसाय शेती रा. तडोळी ता. परळी जि. बीड हे दिनांक १८/१०/२०२३ रोजी दुपारी ०४.३० वाजता तडोळी येथुन परळी वै. येथे ट्रॅक्टरचे काम करण्यासाठी व हप्ता भरण्यासाठी घरातुन २,७०,०००/- रुपये घेवुन मोटार सायकलवर परळी येथील शिवाजी चौकामधुन सातबारा आणण्यासाठी जलालपुर रोडवरील तलाठी कार्यालयाकडे मोटार सायकलने जात असतांना जलालपुर रोडच्या कमानीजवळ मो. सा. समोर पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ चक४४न०८०६ आडवी लावुन आरोपी रघुनाथ फड व ईतर ७ ते ८ जण असे सर्व जण वेळूच्या काठ्या व लोखंडी रॉड घेवुन खाली उतरले व फिर्यादीस गाडीवरुन ओढुन खाली पाडले. रघुनाथ फड म्हणाला की, याला मारा याला सोडु नका भडवा लई माजला आहे असे म्हणाला. त्यावेळी ईतर आरोपीतांनी फिर्यादीस खाली पाडुन तोंडावर पाठीवर काठीने सपासप मारहाण करून जखमी केले. लोखंडी रॉड़ने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यावर मारले. त्यामुळे फिर्यादी गंभीर जखमी झाला. त्यावेळी आरोपीने फिर्यादीस फरशी उचलुन जिवे मारण्याचे उद्देशाने मारहाण केली. यात फिर्यादीचा डावा पाय फैक्चर झाला. त्यावेळी रघुनाथ फड व इतरांनी फिर्यादीचा मोबाईल व पॅन्टच्या खीशातील २,७०,०००/- रुपये रोख काढुन घेतले फिर्यादी जोरजोरात ओरडल्याने जमाव जमला. तेंव्हा आरोपी स्कॉर्पिओ गाडीतुन निघुन गेले. जातांना म्हणाले की, तु आता वाचलास परंतु नंतर आम्ही तुला जिवंत सोडणार नाहीत अशी धमकी देवुन निघुन गेले वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन हा गुन्हा उीझउ कलम १५६ (३) अन्वये न्यायालयाचे आदेशाने दाखल करण्यात आला.



या गुन्ह्याचे तपासात परळी शहर पोलीसांनी आरोपींचा बारकाईने शोध घेवुन गुन्ह्यातील मुख्य आरोपी टोळी प्रमुख नामे रघुनाथ रामराव फड वय ३० वर्ष रा. रामनगर ता. परळी जि. बीड यास दिनांक ०७/०३/

(उर्वरीत पान २ वर)

## चालत्या बसमध्ये वाहकाला आला झटका

प्रतिनिधी @ परळी

रस्त्यावर वेगाने धावणाऱ्या एस. टी. बसमध्ये अचानक कंडक्टरला सौम्य हृदयविकाराचा झटका आला आणि तात्काळ प्रसंगावधान राखून ड्रायव्हरने गाडी थांबविल्याची घटना परळीत आज दिनांक ११ मे रोजी घडली. या घटनेची माहिती मिळताच आजूबाजूला असणाऱ्या परळीकरांनी मदतीसाठी धाव घेऊन माणुसकीचे दर्शन घडविले.

याबाबत अधिक माहिती अशी की, रविवार दि ११ मे रोजी दुपारी पावणे बाराच्या सुमारास परभणी - लातूर चक२०ऋछ ३५१३ ही परभणी डेपोची एस. टी. बस परळी बस स्थानकातून लातूरच्या दिशेने निघाली. ही बस छत्रपती शिवाजी महाराज



चौकाच्या पुढे येताच बसचे कंडक्टर कुंभार यांना अचानक हृदयाचा त्रास सुरु झाला. त्यामुळे तात्काळ बस

(उर्वरीत पान २ वर)

## सैनिकाचा एक मॅसेज अन् खा.सोनवणेंनी केली ट्रेनच्य बुकींगसाठी मदत


### कुटूंबासाठी मिळत नव्हते ट्रेनचे बुकींग, खासदाराच्या कोट्यातून उपलब्ध केले सीट

प्रतिनिधी @ बीड

भारताने पाकिस्थानविरूध्द ऑपेरशन सिंदूर सुरू केल्यानंतर भारतीय सैन्य रात्रंदिवस कामाला लागले. अशावेळी आपले कुटूंब गावी पाठविलेले बरे म्हणून एका सैनिकाने ट्रेनचे बुकींग करण्याचे प्रयत्न केले. परंतु तिकीट मिळत नव्हते. यानंतर सैनिकाने बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना एक मॅसेज केला. यानंतर अवघ्या तिस सेकंदात सोनवणेंनी परत फोन करून समस्या ऐकून घेतली आणि तातडीने रेल्वेबोर्डला पत्र लिहून स्वतच्या कोट्यातील आरक्षीत सीट सैनिकाच्या कुटूंबियासाठी उपलब्ध करून दिली.

पहेलगम येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारताने या दहशतवादी हल्ल्या बदला घेण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू केले. यानंतर देशाच्या सिमेवर तणाव निर्माण झाला. अमृतसर येथे अंबाजोगाई तालुक्यातील बाबळगाव येथील विशाल हनंमतराव करपे पाटील हे सैन्यात काम करत आहेत. अमृतसर येथेही ड्रोनहल्ले करण्यात आले. अशावेळी आपले कुटूंब गावी पाठवावे, असा निर्णय सैनिक

(उर्वरीत पान २ वर)




## अंबाजोगाईत विजांच्या कडकडाटासह पाऊस

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

अंबाजोगाई शहरासह परिसरात रविवारी दुपारी ४ च्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसानं हजेरी लावली. मागील काही दिवसांपासून प्रचंड उकाडा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, रविवारी आलेल्या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली.

आज दिनांक ११ मे रोजी दुपारच्या सुमारास विजांच्या कडकडाटात अंबाजोगाई परिसराला पावसाने झोडपले. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. दरम्यान, हाती आलेल्या माहितीनुसार अंबाजोगाई तालुक्यातील अनेक भागात विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली आहे. पावसाने हजेरी लावल्यामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला होता, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

दरम्यान या वादळीवाऱ्याच्या पावसात सायगाव येथील शेतमजुर सायगाव भारज रस्त्यावरच्या शेतात काम करत आसाताना आचानक पाऊस आल्याने लिंबाच्या झाडाच्या आश्रयाला

(उर्वरीत पान २ वर)



## अखेर पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल

### पोलिस प्रशासनाच्या मदतीने पवनचक्की कंपन्यांची रझाकारी सुरू – डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी @ पाटोदा

जिल्हा आणि पोलिस प्रशासन पवन आणि सौर ऊर्जा कंपनीच्यांचे हस्तक झालेले असुन कंपन्यांना शेत जमीनीचा ताबा देण्यासाठी पोलिस प्रशासन अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन मावेजा मागणा-या शेतकऱ्यांनाच पोलिसी खाक्या दाखवत असुन खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचे प्रकार पाटोदा तालुक्यात आढळून येत आहे.

पाटोदा तालुक्यातील दासखेड ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकरी शिवाजी बाजीराव शिंदे, बालाजी शिवाजी शिंदे आणि जेसीबी आपरेटर या तिघांवर ओटु पवनचक्की कंपनीचे कर्मचारी मोहन रामा गाडे यांच्या तक्रारीवरुन भादंवि ११५(२) ,१२६(२),३०८(२), आणि ३०८(३)(५) कामाला विरोध करणे, जाणिवपूर्वक हत्येचा प्रयत्न करणे आदी कलमांतर्गत दाखल करण्यात आल्याचा दुर्दैवी प्रकार घडला आहे.

जर जिल्हा आणि पोलिस प्रशासन शेतकऱ्यांवरच अन्याय करत असेल तर शेतकऱ्यांनी मावेजा मागण्यासाठी कोणाच्या दारात जायचे. पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना प्रत्यक्ष भेटून जनता दरबारात आपली व्यथा मांडली परंतु त्यांना न्याय देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी असमर्थता दाखवली. त्यामुळे जे जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या जमिनी कंपन्यांच्या ताब्यात देण्यासाठी अमर्याद अधिकार वापरते ते प्रशासन शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाची आस्थेवाईकपणे चौकशी करत नाही आणि लोकप्रतिनिधी याबद्दल चकार शब्द काढत नाहीत हि शोकांतिका असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# संपादकीय

## संसद नव्हे, संविधानच!

सर्वोच्च न्यायालयाने संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व अधोरेखित केलं आहे. न्यायालयाने स्पष्ट केलं की, कायद्याचे निर्णय राजकीय विचारांवर अवलंबून नस्तात. खासदार दुबे यांच्या आरोपांवर न्यायालयाने हे उत्तर दिलं. न्यायपालिकेवर लोकांचा विश्वास असणं आवश्यक आहे. न्यायाधीशांवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे लोकांमध्ये शंका निर्माण झाली आहे.

देशाच्या लोकशाही चौकटीतील सर्वोच्च स्थानाबाबतच्या जुन्या तंट्याला तूर्त पूर्णविराम मिळाला. न्यायपालिका आणि संसद या लोकशाहीतील दोन मजबूत स्तंभांमध्ये हा दृश्य-अदृश्य संघर्ष पूर्वापार चालला आहे. देशातील नागरिकांनी निवडलेले लोकप्रतिनिधींचे व्यासपीठ असल्याने संसदेचे सर्वोच्च स्थान अबाधित असावे, ही झाली नेतेमंडळींची अपेक्षा. सामान्य नागरिकांच्या महत्त्व आणि ममत्वाचा कौल संविधानाकडेच झुकलेला असतो. भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने एका ऐतिहासिक निर्णयाद्वारे संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व अधोरेखित केले. न्यायाची समीक्षा करण्याची जबाबदारी संविधानाने न्यायपालिकेला प्रदान केली असून न्यायालये परीक्षण करताना संविधानाच्या चौकटीतच कार्य करीत असतात, या तथ्याचा न्यायालयाने पुनरुच्चार केला. कायदेशीर तत्त्व हाच न्यायालयीन निर्णयांचा आधार असतो. राजकीय, धार्मिक वा सामूहिक विचारांवर निकाल अवलंबून नसतो, ही न्यायालयाची स्पष्टोक्ती महत्त्वाची आहे. खटल्यांची सुनावणी हे संवैधानिक कर्तव्य असल्याचे सांगतानाच न्यायालयात जाणे हा लोकांचा कायदेशीर अधिकार असल्याच्या वास्तवाकडेही सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधले.

भारतीय जनता पक्षाचे खासदार निशिकांत दुबे यांनी सर्वोच्च न्यायालयावर अराजकतेकडे नेण्याचा आरोप करतानाच सरन्यायाधीशांवरही टीका केली होती. राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकांवर राष्ट्रपतींना ठरावीक मुदत घालून देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांवर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही अलीकडेच परखड टीका केली होती. लोकशाही व्यवस्थेत संसदच सर्वोच्च असल्याच्या मताचा त्यांनी पुनरुच्चार केला होता. न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी लागलेल्या आगीच्या घटनेवेळी कोट्यवधीची रोख सापडल्यानंतरही कारवाईला झालेल्या विलंबाबद्दल नाराजी दर्शविताना धनखड यांनी न्यायपालिकेबद्दल थेट संशय व्यक्त केला.

खासदार दुबे यांचे आरोप तसेच उपराष्ट्रपतींनी केलेल्या संत्रस्त वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाकडून संसद नव्हे, तर संविधानाचे स्थान देशात सर्वश्रेष्ठ असल्याचा थेट निर्णय आला. द्वेष पसरविण्याचा प्रयत्न करणारी प्रकरणे कठोरतेने हाताळण्याचा संकल्प न्यायालयाच्या निर्णयातून झळकला. सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्या. संयजकुमार यांच्या खंडपीठाने दिलेल्या निर्देशांनी लोकशाही संरचनेची ठेवण लक्षात आणून दिली. अर्थात, न्यायपालिकेविषयी श्रद्धा बाळगणाऱ्या देशातील सामान्यांच्या मनात काही किंतु दडले असल्याच्या वास्तवाकडेही लक्ष द्यायला हवे. न्यायाधीशांवर होणारे भ्रष्टाचाराचे आरोप आणि या व्यवस्थेतील न्यूनत्वाने विश्वसनीयता संशयात सापडली आहे.

न्या. यशवंत वर्मा यांच्या घरात जळालेल्या नोटांचे घबाड गवसल्यानंतर लोकमनांतील साशंकता उफाळून आली. समानता आणि स्वातंत्र्याच्या सोबतीने न्यायाला विराजमान करायचे असल्यास नागरिकांचा विश्वास पुनर्संपादित करावा लागेल. न्यायालयीन रिक्त पदांनी; तसेच खटल्यांच्या संथगतीनेही सर्वांना व्यथित केले आहे. आभासी सुनावणी आणि डिजिटल प्रक्रियेची मदत घेतल्यानंतरही सद्यस्थितीत देशभरात अंदाजे पावणेपाच कोटी खटले रेंगाळले आहेत. त्यातील सर्वोच्च न्यायालयातील संख्या ऐंशी हजारांहून अधिक आहे. त्वरित न्यायासाठी लोकांनी गैरप्रकारांचा अवलंब केल्यास त्याचा दोष व्यवस्थेवर जाईल.

# मौजे आष्टी ग्रामपंचायत मधील भ्रष्टाचारा विरुद्ध उपोषणाचा १२ दिवस उपोषण कर्त्यास गुळमळ

## पत्र देऊन उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पं) उदयसिंग राजपूत चा भ्रष्टाचार दाबण्याचा खेळ

प्रतिनिधी @ जालना

परतूर तालुक्यातील मौजे आष्टी ग्रामपंचायत मध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशी संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांना मौजे आष्टी ग्रामपंचायत मधील झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासंदर्भात निवेदन देऊन जालना जिल्हा परिषदेसमोर दि.१ मे पासून भगवान रंगनाथ वाघमारे यांनी उपोषण सुरु केले असून आज उपोषणाला १२ दिवस झाले असून मौजे आष्टी ग्रामपंचायत चे ग्रामसेवक आणि सरपंच यांनी संगनमत करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला ग्रामपंचायत मध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या विरुद्ध लोकशाही मार्गाने भगवान रंगनाथ वाघमारे हे १२ दिवसापासून जिल्हा परिषद जालना कार्यालयासमोर उपोषण करत असून या गेंड्याच्या कातडीचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग उदयसिंग राजपूत हे उपोषण कर्त्यास गुळमळ पत्र देऊन उठवण्याचा प्रयत्न करत आहे.उपोषण कर्त्यास दिशाभूल करणारे पत्र देऊन उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग उदयसिंग राजपूत हे त्यांच्या पदाचा दबाव वापरून उपोषण कर्त्यावर दबाव टाकून मौजे आष्टी येथील ग्रामपंचायत मध्ये ग्रामसेवक डी.बी.काळे आणि सरपंच यांनी संगनमताने केलेला भ्रष्टाचार दाबण्याचा खेळ




करत आहे.उपोषण कर्ता हा कोण्या राजकीय पक्षाचा किंवा संघटनेचा कार्यकर्ता नसून तो एक सर्वसाधारण व्यक्ती आहे.आणि ग्रामसेवक डी.बी.काळे हा ग्रामसेवक संघटनेचा जिल्हाध्यक्ष असून तो आपल्या संघटनेच्या पदाचा आणि पैशाच्या जोरावर वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरुन लोकशाही मार्गाने उपोषण करणारे भगवान रंगनाथ वाघमारे साधारण उपोषण कर्त्याला कायद्याचा दाख दाखून भ्रष्टाचार कोणी उघडा करु नये या उद्देशाने उपोषण कर्त्यावर दबाव टाकून उपोषण कर्त्याला गोलमोल व दिशाभूल करणारे पत्र देऊन उपोषण सोडण्यास मजबूर करीत आहेत.भ्रष्टचाराची साखळी ग्रामपंचायतच्या ग्रामसेवक पासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत साखळी असल्यामुळे साधारण उपोषण कर्त्यास न्याय कोण देईल व कोणाकडे न्याय मागावा अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.त्यामुळे अशा विवंचनेतून उपोषण कर्त्याचे मानसिक संतुलन बिघडल्यास आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात याला कारणीभूत असे गेंड्याच्या कातडीचे मग्रूर अधिकारी ठरतात ग्रामसेवक व इतर त्याचे सहकारी लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करतात आणि भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून आपल्या पदाचा आणि पैशाच्या बळावर सर्वसाधारण उपोषण कर्त्यावर दबाव टाकून त्याच्या मनात भिती निर्माण करुन भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न करतात मौजे आष्टी ग्रामपंचायत मध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी होऊन न्याय मिळेल अशा आशेने भगवान रंगनाथ वाघमारे हे गेल्या १२ दिवसापासून जालना जिल्हा परिषद कार्यालयासमोर उपोषण करत असून गेंड्याच्या कातडीचे जिल्हा परिषद अधिकारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग उदयसिंग राजपूत हे उपोषण कर्त्यास गुळमळ व दिशाभूल करणारे पत्र देऊन उपोषण कर्त्याला मानसिक त्रास देण्याचे काम करत असून मला न्याय कोण देणार ? असे उपोषण कर्ते भगवान रंगनाथ वाघमारे यांनी सांगितले

# राजवैभवाचे सुख लाथाडून बैरागी हर्ष देसरडाला निरोप देतांना अरव्खे शहर ओशाळले !



## अध्यात्मिक क्षेत्रात जन्मभुमिचे नांव रोषन करेल -मुमूक्षू हर्ष देसरडा !

प्रतिनिधी @ मानुर

शिरूर कासार येथील प्रथित यश प्राप्त व्यापार व राजकिय क्षेत्रात नावलौकिक प्राप्त नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षा श्वेता प्रकाश देसरडा यांचा एकविस वर्षीय हर्ष याने सर्व ऐश्वर्याचा त्याग करून गुरू आज्ञा प्रमाण माणून दिक्षा घेऊन जैन मुनी होण्याचा निर्णय घेतला . संसारी आभासी सुखाकडून शास्वत सुखाकडे काट्याच्या वाटेवरून निघालेल्या हर्षचा दिक्षापुर्व स्वागत व निरोप कार्यक्रम संपन्न झाला .आपल्या माता पित्याचे शनिवारी चरणक्षालन व गळाभेट घेऊन जन्मभुमिचा निरोप घेतला ,यावेळी



हर्षचा वियोग आणि विरहाने अख्खे शहर ओशाळले , उपस्थितांना गहिवर दाटून आल्याचे हृदयाला पाझर फुटणारे चित्र दिसून आले .

बालाजी मंदिराच्या प्रांगणात बिदाई कार्यक्रम आयोजीत केला होता मोठ्या संखेने जैन बांधवासह अन्य ग्रामस्थ उपस्थित होते .यावेळी ऋणनिर्देश करतांना आजोबा कांतिलालजी देसरडा , आजी , चुलते चुलती ,भाऊ ,बहिण यांचे हर्षने ऋण व्यक्त केले .आपले वडील प्रकाश व आई श्वेता देसरडा यांचे चरण क्षालन करून गळाभेट ज्यावेळी घेतली त्यावेळी हृदयात हुंदके दाटून येत होते .सर्व सुख ,श्रीमंती ,ऐश्वर्य घरात नांदत असतांना गुरू आज्ञा प्रमाण मानून दिक्षा घेण्याचा कठोर निर्णय घेतला आणि तो अंमलात आणन्यासाठी कठोर तपस्या पत्कारली .आपल्या राहत्या घरातून हर्षची बिदाई एक अविस्मरणीय सुखदुःख मिश्रीत अनुभव होता.

पित्याचा अंतीम संदेश !

कठोर तपसाधना माहिती असुन देखील त्याच्या निर्णयाला संमती दिली असली तरी माया आणि मोहाने डोळे डबडबल्या वाचून राहत नव्हते अशा प्रसंगी पिता प्रकाश देसरडा यांनी चार ओळीचा सिंहाप्रमाणे संयम ठेवण्याचा संदेश दिला .

### ऋणनिर्देश आणि अभिवचन !

निरोप घेतांना मार्गस्थ बैरागी हर्ष याने आई वडील चुलते चुलती भाऊ बहिण आजी आजोबा यांचे ऋण व्यक्त केलेच परंतू ही जन्मभुमि एक अध्यात्मिक केंद्र असुन मला मिळालेले प्रेम पुढच्या वाटचालीसाठी बळ देईल ,मी अध्यात्मिक क्षेत्रात गावचे नांव रोषन करेल असे अभिवचन देऊन अखेरचा निरोप घेतला .

# दावरवाडीत ४८ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू......!

प्रतिनिधी @ दावरवाडी

सकाळी शेतातून काम करून घरी आल्यानंतर एका ४८ वर्षिय शेतकऱ्याचा उष्माघातामुळे मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना दावरवाडी( ता. पैठण) येथे शनिवारी ( दि.१०)रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली असून संजय जनार्धन सरोदे वय (४८)असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. संजय सरोदे याची उत्तरीय तपासणी करण्यात आली असून या तपासणीचे रिपोर्ट आल्यांनतर सरोदे यांचा मृत्यू नेमके कशामुळे झाला हे स्पष्ट होईल.

याविषयी नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, पैठण तालुक्यातील दावरवाडी येथील संजय सरोदे यांना दोन एकर शेती असून ते शेती काम करत होते. संजय सरोदे यांना तीन मुली तर एक मुलगा आहे. काही वर्षांपूर्वीच सरोदे यांच्या दोन मुलीचा विवाह देखील झालेला आहे, सध्या ते एक मुलगी व मुलगा आणि पत्नी शेती काम करून आपल्या संसाराचा गाडा हाकलत होते. शनिवारी सकाळी ते लवकरच उठून शेतामध्ये कामानिमित्त गेले होते. दुपारी बारा ते एक वाजेच्या



सुमारास संजय सरोदे हे गावात आले होते. मात्र उन्हाचा तडाका वाढलेला असल्यामुळे त्यांना त्या गावात भोवळ आल्यांने जमिनिवर कोसळले होते. सरोदे यांना भोवळ आल्याची गावकऱ्यांच्या लक्षात आले असता त्यांनी तातडीने पाचोड येथील ग्रामीण रुग्णालयात त्यांना उपचारासाठी दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ.संदिपान काळे यांनी त्यास तपासून घोषित केले आहे. या घटनेची नोंद पाचोड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सपोनि शरदचंद्र रोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली दावरवाडी बीट जमादार , गणेश बोरकर व कृष्णा बरबडे सहकारी करत आहेत.

पान १ वरून...

### दहशत, गुन्हे करणाऱ्या....

२०२५ रोजी अटक केली. तसेच गुन्ह्यातील आरोपी क्र. २) जगन्नाथ विक्रम फड वय ४५ वर्ष रा. बजरंग नगर परळी वै. जि. बीड. ३) सुदिप रावसाहेब सोनवणे वय २८ वर्ष रा. सिध्दर्थ नगर परळी वै. जि. बीड. ४) बालाजी अंकुश दहीफळे वय २४ वर्ष रा. माणिक नगर परळी वै, जि. बीड. ५) विलास बालाजी गिते वय २७ वर्ष रा. नंदागौळ ता. परळी वै. जि. बीड. यांना दिनांक २८/०३/२०२५ रोजी २०.३४ वा. अटक करुन तपास करण्यात आला व गुन्ह्यातील ०२ आरोपी फरार आहेत. या टोळीने आज पावेतो संघटीतरीत्या पो, स्टे. परळी शहर, संभाजीनगर व अंबाजोगाई ग्रामीण हद्दीत एकुण १० गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. ज्यात खुनाचा प्रयत्न, दुखापत करणे, दंगा करणे, कट रचणे, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणे, दरोडा टाकणे, रस्ता आडवीणे, मारहाण करणे, सरकारी कामात अडथळा आणने, गंभीर दुखापत करणे या सारखे गंभीरस्वरुपाचे गुन्हे केले आहेत. प्रस्तावात एकुण १० गुन्हे विचारात घेण्यात आले. त्यापैको ०९ गुन्हयांची दखल न्यायालयाने घेतलेली असुन ०१ गुन्हा पोलीस तपासावर आहे.

सर्व गुन्हे १० वर्षांच्या आतील असुन ०३ वर्षापेक्षा जास्त शिक्षेस पात्र आहेत. या टोळीचा टोळी प्रमुख याने स्वतःच्या व टोळीतील इतर सदस्यांच्या आधीक फायदयासाठी हे गुन्हे केल्याचे पोलीस अधीक्षकांच्या चानाक्ष नजरेतुन लपुन राहीले नाही. त्यावरुन बीड जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन या प्रकरणांत तपासी अधिकारी पोनि रघुनाथ नाचण पो.स्टे. परळी शहर यांनी अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई व उपविपोअ अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली या टोळी विरुध्द मोक्का कायद्या अंतर्गत प्रस्ताव तयार करुन दिनांक २९/०४/२०२५ रोजी पोलीस अधीक्षकांना सादर केला होता. पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक ०४/०५/२०२५ रोजी प्रस्ताव आपले शिफारशीसह विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांना सादर केला होता. विरेंद्र मिश्र्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन दिनांक ०७/०५/२०२५ रोजी नमूद संदर्भीय गुन्हयांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ मधील कलमांचा अंतर्भाव करण्याची परवानगी दिल्याने पोलीस अधीक्षक बीड यांनी सदर प्रकरणांचा पुढील तपास अनिल चोरमले, उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबाजोगाई यांचेकडे दिला आहे. मोक्का कायदयाचे कलम ३(१) (ळळ).३(२),३(४) समाविष्ठ करणे बाबत आदेशीत केले आहे. त्यावरुन उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई हे सदर गुन्हयांचा पुढील तपास करीत आहेत.

तसेच नमूद गुन्हातील न्यायालयाकडून जामीन मंजुर झालेल्या ०४ आरोपींचे जामीन रद्द करण्यासाठी तपास अधिकारी यांनी प्रस्ताव न्यायालयात सादर केले आहेत. ही कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले, पोलीस निरीक्षक उस्मान शेख, स्थागुशा बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि रघुनाथ नाचण, सपोनि योगेश शिंदे पो.अं. पंडीत पांचाळ, धनश्री भताने, किशोर घटमळ पो. स्टे. परळी शहर तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, निलेश ठाकुर, विभीषण चव्हाण स्थागुशा बीड यांनी केली आहे.

भविष्यातही शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगार व गुन्हेगारांच्या टोळयावर व कायद्याला न जुमानणाऱ्या व्यक्ती विरुध्द तसेच बीड जिल्ह्यात धुमाकुळ घालणाऱ्या गुन्हेगारांवर मोक्का व एम.पी.डी.ए.कायदया अंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनित कॉवत यांनी दिले आहेत.

### अंबाजोगाईत विजांच्या ...

आले. यावेळी अचानक वीज कोसळली. यात शेतमजुर दिगंबर शंकर गायकवाड (वय - ६०) यांच्या अंगावर विज कोसळून ठार झाले आहेत.तालुक्यातील सुगाव येथील शेतकरी सत्तार अंबीरखाँ पटेल यांच्या शेतात झाडावर वीज कोसळून म्हैस दगावल्याची

पान १ वरून...

घटना घडली आहे .

### देशाच्या एकतेसाठी आणि ...

आंबेडकर चौक येथे समाप्त झाली. यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते, पदाधिकारी, युवक,आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.हातात तिरंगा आणि मुखात देशभक्तिपर घोषणा भारत माता की जय, जय जवान, जय किसान,जय संविधान, अशा घोषणांनी वातावरण देशभक्तीने भारून गेले होते. रॅलीदरम्यान संविधानाची प्रस्तावना वाचून देशाच्या एकतेची वचनबद्धता व्यक्त करण्यात आली.या वेळी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की,बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस केवळ एक साजरा करण्याचा दिवस नसून, तो सामाजिक संदेश देण्याचा आणि जनतेला संविधानप्रेम व देशप्रेम जागवण्याचा दिवस आहे. यंदाचा वाढदिवस सीमेवरील जवानांना समर्पित करून आम्ही देशप्रेमाचे उदाहरण समाजापुढे ठेवले आहे.ही रॅली शांततेत, शिस्तबद्धपणे पार पडली असून, पाटोद्याच्या जनतेतून वंचित बहुजन आघाडीच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### सैनिकाचा एक मॅसेज ...

असलेले विशाल करपे यांनी घेतला. यानंतर दि.९ रोजी त्यांनी ट्रेन बुकींगसाठी प्रयत्न केले. परंतु सर्वत्र गोंधळाची स्थिती असल्याने ट्रेनमध्ये प्रवाशांची संख्या वाढली. परिणामी, तिकीटाचे बुकींग मिळत नव्हते. दोन दिवस प्रयत्न करूनही तिकीट बुकींग होत नाही, हे लक्षात आल्यानंतर करपे यांनी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना तिकीट बुकींग करण्याबाबत काही मदत होईल का, या भावनेने दि.१० रोजी मॅसेज केले. मॅसेजनंतर अवघ्या तीस सेकंदात खा.सोनवणे यांनी करपे यांनी कॉल करून काय मदत करावी, असे म्हणत त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले. यानंतर तातडीने रेल्वेबोर्डला लिहले. सदरील पत्र रेल्वेविभागाचे विभागीय कार्यालय,फैजपुर येथे पाठविण्यात आले. यानंतर तातडीने त्यांना दि.११ मे रोजीची बुकींग मिळाली. दि.११ रोजी सकाळी करपे यांच्या पत्नी, दोन मुले ट्रेममध्ये बसवून गावी पाठविण्यात आले. यावेळी विशाल करपे यांनी सैनिकाच्या मदतीला खासदार आले, याबाबत आभार मानले.

भारताच्या रक्षणासाठी आपले सैनिक जिवाची बाजी लावून सिमेवर लढत आहेत. विशाल करपे यांनी रेल्वे बुकींगच्या बाबतीत मॅसेज केला. यानंतर मी तातडीने शक्य ते केले. आपले पत्र सैनिकाच्या कामी यावे, यापेक्षा मोठा काय आनंद असू शकतो. त्यांची सेवा करणे आपले कर्तव्य असून मी कर्तव्य भावनेतून काम करत आहे.

-बजरंग सोनवणे, खासदार, बीड.

अमृतसर येथून ट्रेनचे बुकींग मिळत नव्हते. इकडे तणाव असल्याने कुटूंब सुखरूप गावी पाठविणे आवश्यक होते. यामुळे मी खा.बजरंग सोनवणे यांना मॅसेज केला. त्यांनी फोन करून आपुलकीने विचारपूस करत तातडीने पत्र देऊन मला मदत केली. यामुळे खून आनंद वाटत आहे.

-विशाल करपे, भारतीय सैनिक.

### चालत्या बसमध्ये ....

चालकांनी गाडी रस्त्याच्या कडेला घेऊन उभी केली. त्यानंतर कंडक्टर कुंभार यांना खाली उतरवून बाजूलाच असलेल्या झाडाच्या सावलीखाली झोपविण्यात आले. व त्यांना हवा घालण्यात आली. तोपर्यंत आजूबाजूला असलेल्या परळीतील नागरिकांनी कुंभार यांच्याकडे धाव घेतली व त्यांना तात्काळ दवाखान्यात नेण्यासाठी प्रयत्न करु लागले. परंतू कुंभार यांच्याकडे असलेल्या गोळ्या त्यांनी खाल्या.कुंभार यांना थोडे बरे वाटल्यानंतर परळीकरांनी ड्रायव्हर आणि कंडक्टर यांना चहा, पाणी पाजून पुन्हा बस मध्ये बसवून सदर बस परळी डेपोकडे वाटे लावली. परळी डेपोतील वाहतुक निरिक्षक कपिल चिंदालीया व वाहतूक नियंत्रक राठोड यांनी त्यांना दवाखान्यात नेले. कुंभार यांनी उपचार घेतल्यानंतर ड्रायव्हर व कंडक्टर दोघांनाही आरामासाठी थांबवून घेतले आहे.



## वडार समाज महाराष्ट्र मजुर शिल्प प्रतिष्ठाणच्यावतीने कामगार दिनादिवशी

# पुरस्कार सोहळा संपन्न

प्रतिनिधी @ आष्टी

पिंपरी चिंचवड येथील वडार समाज महाराष्ट्र मजुर शिल्प प्रतिष्ठाण चिंचवड या सामाजिक संस्थेकडून १ मे कामगार दिनानिमित्त वडार समाज मजुर शिल्प समाज बांधवांना पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते संतोष मुरकुटे व संस्थेचे उपाध्यक्ष सचिन चौगुले यांच्या सौजन्य लाभले. हा सोहळा बर्ड व्हॉली गार्डनमध्ये मोठ्या थाटात संपन्न झाला.खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांच्या शुभ हस्ते वडार मजूर दाम्पत्याला शिल्प पुष हार अर्पण राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिभाशाली महिलांना व पुरुषांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन पुरस्कृत करण्यात आले. विधानपरिषदचे आमदार मा. अमित गोरखे, माजी उपमाहापौर मा. श्री. तुषारभाऊ हिंगे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. एस. एन. पवार (सेवानिवृत्त शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य) स्वागताध्यक्ष मा. शशिकांत लष्करे, विशाल काळभोर, मी वडार महाराष्ट्राचा प्रदेश कार्याध्यक्ष मा. सुरेश धोत्रे मा. भरत विटकर, शिरूर कॉग्रेस महिला अध्यक्षा सौ. प्रियांका बंडगर, मा. उद्योगपती मा. रमेश शिंदे, मा. राकेश विटकर, मा. सुरेश कुराडे, जेष्ठ साहित्यिक मा. टी. एस. चव्हाण, स्विकृत नगरसेविका कु. अपर्णाताई कुराडे, मा. विठ्ठल मोरे, ललिता धनावडे, मारुती धोत्रे, शाम पवार, अशोक पवार, हरीश बंडीवडार आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिभाशाली महिलांना व पुरुषांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन पुरस्कृत करण्यात आले. तसेच समाज रत्न पुरस्कार म्हणून सौ. निर्मलाताई कुराडे श्रीमती, सुनीता जाधव, श्री. यल्लाप्पा कुसाळकर तर समाज गौरव म्हणून श्री. लहू बंदपट्टे, काशिनाथ आनंदकर सोलापूर, चंदर मुधोळ, पुणे, सौ.उज्वला पवार, धाराशिव, बाळु दांडेकर, पुणे, अशोक जाधव, पुणे, चंद्रकात जाधव, कोल्हाट, निखिल आळकुटे, पुणे, वसंत पवार, नवी मुबंई गुण गौरव पुरस्कार, कु. डॉ. स्वजल जाधव, कु. सोनु आनंद मोरे (पोलीस) कु. सोनाली संदीप शिंदे, खाण कामगार जेष्ठ नागरिक सन्मान करू तुकाराम शेलार, म्हादू वेताळ यांनी पुरस्काराने सन्मानित केले आहे. या पुरस्कारासाठी सौजन्य म्हणून संतोष आण्णासाहेब मुरकुटे, संस्थेचे उपाध्यक्ष सचिन चौगुले यांचे लाभले व विशेष सहकार्य विष्णु चौगुले यांनी केले. संयोजक उपाध्यक्ष सचिन चौगुले, अमर दौंडकर, राजु कुसाळकर, अनिल विटकर, अनंत नलावडे, अक्षय पवार, अक्षय कुसाळकर यांनी संयोजक म्हणून काम पाहिले तर प्रास्ताविक शामराव विटकर व आभारप्रदर्शन लखन पाटकर यांनी केले. या पुरस्कार सोहळ्यासाठी समाज बांधव व भागिनी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मस्साजोग येथील नदी खोलीकरण कामाची ॲड. अजित देशमुख यांनी केली पाहणी

प्रतिनिधी @ बीड



नाम फाउंडेशन मार्फत मस्साजोग येथील नदी खोलीकरणाचे काम चालू आहे. या कामाची पाहणी जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी आज केली. काम चांगल्या पद्धतीने चालू असून नदीची खोली आणि रुंदी देखील चांगली असल्याने देशमुख यांनी यावेळी समाधान व्यक्त केले.

नाम फाउंडेशन मार्फत नदी खोलीकरणासाठी ड. अजित देशमुख यांनी मशीन उपलब्ध करून दिल्यानंतर जवळपास तीन किलोमीटर परिसरातील नदीचे खोलीकरण होत आहे. या कामाने वेग घेतला असून यातून मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये देखील उत्साहाची वातावरण आहे.नदी परिसरात फिरताना आज धनंजय देशमुख, भागवत कदम, तुषार देशमुख, सुदर्शन देशमुख, मनोज देशमुख यांच्यासह शेतकरी देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कामाची गती आणखी वाढवून कामाचे प्रमाण देखील वाढवावे, असे यावेळी देशमुख यांनी म्हटले.या नदीपात्रात असलेले बंधारे आता मोठ्या प्रमाणात पाणी साठवून ठेवणार असल्यामुळे पावसाळ्यात शेतकऱ्यांच्या मनातील आनंद वृद्धिंगत होणार आहे. यातून पिकत नसलेली शेती आता पिकणार असल्यामुळे शेतकरी देखील समाधान व्यक्त करत होते.



बीड – डोईफोडवाडी तालुका बीड येथे ह भ प व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी यांची नाम जप सप्ताहाच्या काल्याच्या किर्तन प्रसंगी रथात बसवून वाजत गाजत गावभर मिरवणूक काढण्यात आली. यानंतर किर्तनस्थळाकडे आणण्यात आले. याप्रसंगी डोईफोडवाडी व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्त उपस्थित होते. ( छाया तात्यासाहेब डोईफोडे )

## कुं.राणी भारतराव राऊत यांचे निधन



प्रतिनिधी @ बीड

बीड शहरातील हिरालाल चौक येथील रहिवासी कुं.राणी भारतराव राऊत यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्या मृत्यवेळी ३० वर्षाच्या होत्या.यांचा अंत्यविधी रविवारी रात्री ०८:०० वाजता अमरधाम स्मशानभूमी मोंढा रोड येथे अंत्यविधी करण्यात आला.त्यांच्या पश्चात आई वडील दोन भाऊ तीन बहीण असा मोठा परिवार आहे. दैनिक समर्थ राजयोग राऊत परिवाराच्या दुखाःत सहभागी आहे.

# सांगवी पाटण येथे बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा सोहळा उत्साहात संपन्न

## माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे - भिक्खू संघ

## आष्टी तालुक्यात प्रथमच ५५ भिक्खू यांनी लावली हजेरी

बौद्धजन सेवा फाउंडेशन आयोजित बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा कार्यक्रमाचे नियोजन अतिशय छान केले - आ.सुरेश धस

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे दि. १० मे २०२५ रोजी बौद्धजन सेवा फाउंडेशन आयोजित बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्रातील नामवंत भिक्खू संघ ५५ भिक्खू यांनी हजेरी लावली व धम्मदेसना दिली, कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता पंचरमी धम्मध्वजारोहण व बुद्ध वंदना करण्यात आली, सायंकाळी ४ वाजता महाराष्ट्रातील प्रसिध्द भिक्खू संघ व बुद्ध मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी तीन क्विंटल फुलांची उधळण, बँड, भव्य दिव्य डेकोरेशन लाइटिंग, रथ मिरवणूक, उपासक, उपासीका व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत



मिरवणुक काढण्यात आली. सायं. ६ वाजता बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा व भोजनदान झाले. सायं ६.३० वाजता भिक्खू संघ यांनी प्रमुख धम्मदेसना दिली आणि रात्री सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास आ. सुरेश धस हे उपस्थित राहून त्यांनी बुद्ध मूर्तीचे दर्शन घेतले व महाराष्ट्रातून आलेल्या नामांकित भिक्खू संघ यांचे मानले आभार. सांगवी पाटण येथील उपासक, उपासीका, ग्रामस्थांनी कार्यक्रम यशस्वी केल्यामुळे त्यांचे कौतुक केले. कार्यक्रम प्रसंगी मा. सभापती शत्रुघ्न मरकड, सरपंच दत्तात्रय खोटे, उपसरपंच राहुल खिलारे, पत्रकार संदीप जाधव, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, ग्रा. पं. सदस्य, ग्रामस्थ, उपासक, उपासीका, पंचक्रोशीतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रस्तावना विठ्ठल खंडागळे यांनी केली तर सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार राजाराम खंडागळे यांनी मानले. दि.११ मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता क्रांतीचा साक्षीदार एकपात्री नाटकाचे आयोजन केले होते तर दि. १२ मे २०२५ रोजी संयुक्त जयंतीनिमित्त तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची गावात भव्य मिरवणूक करून जयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे, त्यानिमित्त पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बौद्धजन सेवा फाउंडेशन सांगवी पाटण यांनी केले आहे.

# अभिनेता मिथुन चक्रवर्ती यांच्या हॉटेलला भेट

## व्यवसाय कौशल्याचा अनोखा अनुभव!

प्रतिनिधी @ आष्टी

उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग करत पत्रकार, प्राध्यापक, इंजिनियर, शिक्षक, शिक्षीका, हाटेल व्यवसायीक यांच्यासह नातेवाईक फॅमिलीने महाराष्ट्र राज्य व राज्याबाहेर कर्नाटक, तामिळनाडु मधील (उटी, मैसुर, कोडाईकनल, कनाल, कोयंबतूर) तामीळनाडुमधील विविध स्थळांना भेटी देत अनोखा अनुभव अनुभवला. दरम्यान, हिंदी चित्रपट सृष्टीतील सुपर स्टार तथा ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांच्या हॉटेलला भेट देण्याचा विशेष योग आल्याने पत्रकार उत्तम बोडखे, सौ. बबिताताई बोडखे, प्रा. मोहन धोंडे सर, सौ. आशा रासकर मॅडम, गणेश धोंडे सर, अर्जुन रासकर सर, सौ. प्रभा रासकर मॅडम, भाऊसाहेब रासकर सर, कु. श्वेता अर्जुन रासकर यांच्यासह फॅमिली प्रचंड उत्सुकतेने पाहण्यात मग्न झाली.

आष्टी व जामखेड येथील नातेवाईक फमिलीने भेट दिलेली स्थळ मैसूर पॅलेस, मैसूर झू, चामुंडा हिल, चामुंडा देवी दर्शन, वृंदावन गार्डन उटी, मधुमलाई फॉरेस्ट, पायकरा वॉटर फॉल, पाईन फॉरेस्ट, रोज गार्डन, मिथुन चक्रवर्ती यांचे द मोनार्च हॉटेल, कोडाईकनल – उदगमंडलम ते कन्नूर टॉय ट्रेन, कोडई कन्नड लेक, कोयंबतूर – आदियोगी मंदीर अशा कर्नाटक व तामिळनाडु या राज्यातील ऐतिहासिक सांस्कृतिक ठेवा जतन असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण ठिकाणांना भेटी दिल्या. दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक तथा ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे आणि




फॅमिली गेल्या दोन दिवसापासून देशातील विविध ठिकाणच्या वैशिष्ट्यपूर्ण स्थळांना भेट देत आहेत. त्यांनी नुकतीच बेंगलोर, म्हैसूर, उटी, कोयंबतूर येथील संस्मरणीय ठेवा असलेल्या स्थानांना भेटी दिल्या. मैसुर येथील ऐतिहासिक मैसुर पलेस पाहिले. तसेच हिंदी चित्रपट सृष्टीतील सुपरस्टार तथा जेष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांच्या द मोनार्च हाटेल उटी या हॉटेलला भेट देण्याचा योग आला. हॉटेलची उभारणी, ग्राहकासाठी उपलब्ध असलेल्या सुविधा आणि सोयी विशेष अनुभवायला आल्या. दरम्यान, या भेटीमधून देशाची वैविध्यपूर्ण स्थिती, विविधतेतून एकता, विविध जाती धर्मातून एकसंघ राहण्याची भावना या राष्ट्रीय एकात्मता या बाबी शिकण्यास मिळतात अशी प्रतिक्रिया प्रा. मोहन धोंडे यांनी दिली.

# खिळद येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर नाही तर बाबासाहेबांचे विचार डोक्यात घेतले पाहिजे – समीर शेख

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी तालुक्यातील खिळद येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त व तथागत गौतम बुद्ध सार्वजनिक जयंतीनिमित्त दि. ८ मे २०२५ रोजी भिमज्योत मित्र मंडळ यांच्या वतीने गावात जंगी मिरवणूक कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी कार्यक्रमास यशवंत खंडागळे, अशोक साळवे, सरपंच श्रीराम गर्जे, भरत जाधव, पत्रकार संजय खंडागळे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, दीपक बोराडे, पत्रकार संदीप जाधव, विकास साबळे, भाऊ खेत्रे, नवनाथ सातपुते, हरी गोरे, पत्रकार दादा पवळ, सुनील साखरे, विजय साखरे, तुषार साखरे, सुशांत साखरे, अजय साखरे, प्रबोधन साखरे, शरद सपुत्रे, भैय्या सपुत्रे, प्रथम साळवे, सोपान साखरे, संदीप आंधळे, जय आंधळे



तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ व बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच दि. ८ मे २०२५ रोजी भव्य दिव्य मिरवणुकीचे आयोजन केले होते व भीमनगर खिळद येथे जेवणाचे आयोजन केले होते, यावेळी माता भगिनी, व पंचक्रोशीतील भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले तर भीमज्योत मित्र मंडळ यांच्यावतीने सुनील साखरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# जिल्हाधिकारी साहेब कुंडलीका धरणातील अवैध गाळ उपसा कधी बंद करणार गाळमाफियांचा नंगानाच सुरुच

## शासनाचा महसूल बुडत आहे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अचानक भेट द्यावी

प्रतिनिधी @ वडवणी

जिल्हाधिकारी साहेब कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपसा कधी बंद करणार व शेतकऱ्यांसाठी हा गाळ कधी खुला करणार असा सवाल येथील शेतकरी करत आहेत.धारूर तालुक्यातील धुनकवाड येथील कुंडलिका धरणातील शासनाने भूसपादित केलेल्या जमिनीवरील अवैध गाळ उपसा हा मोठ्या प्रमाणात सुरू असून हा गाळ शेतकऱ्यांना न देता हा गाळ वीटभट्टी धारकांना विकला जात आहे.यामुळे गाळ माफियांचा नंगानाच सुरूच आहे.तरी जिल्हाधिकारी यांनी कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपशाला अचानक भेट देऊन याची पाहणी करून शहानिशा करावी.

हा गाळ उपशासाठी तालुका प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी व गाळमाफिया यांचे संगणमत असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे कोट्यावधी रुपयांच्या गाळासाठी लाखो रुपयांची डिल झाले असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे. तरी इथे एक महसुलचा कर्मचाऱ्याची नेमणूक करुन हा गाळ किती शेतकऱ्यांना दिला जातो व किती वीट भट्टी धारकांना दिला जातो व किती टिप्पर जातात व किती रॉयल्टी भरतात त्याची नोंद घेण्यासाठी एक कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ५मे रोजी गाळ मुक्तधरण व गाळयुक्त शिवार या शासनाच्या योजनेच्या रथाचे उद्घाटन करून गावागावात जाऊन याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी जात आहे.धुनकवाड येथे ही या रथाला आणुन या रथाच्या माध्यमातून हा कुंडलिका धरणातील अवैध गाळ उपसा थांबवावा व हा गाळ वीटभट्टी धारकांच्या घशात जात असलेला गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी खुला करून देण्यात यावा यामुळे शेतकरी वंचित राहणार नाहीत अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

तरी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतःहा या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे लक्ष देऊन अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना धडा शिकवावा व शेतकऱ्यांचे नंदनवन करण्यासाठी शेतकऱ्यांना हा गाळ खुला करून देऊन शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा व एकदा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या कुंडलिका धरणातील गाळ उपशाला अचानक भेट देऊन याची पाहणी करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

कुंडलिका धरणातील हा अवैध गाळ उपसा विट भट्टी धारकांना दिला जात असुन हा गाळ उपसाची मोठ्या प्रमाणात टिप्परची वाहातुक सुरू असुन हा गाळ घेऊन जात असताना या धुळीने शेतकऱ्यांच्या पिकांवर गाळाचा थर साचत असून शेतकऱ्यांना आपल्या पिकाची





### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अचानक भेट द्यावी

बीड जिल्ह्याला कर्तव्यदक्ष असे जिल्हाधिकारी लाभले आहेत परंतु तालुका प्रशासन यांच्या कृपाशीर्वादाने कुंडलिका धरणातील गाळमाफी यांच्या संगनमताने अवैध गाळ उपसा मोठ्या प्रमाणात सुरू असून या कुंडलिका धरणातील गाळ उपशाला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अचानक भेट देऊन या तलावातील अवैध गाळ उपशाची शहानिशा करून पाहणी करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

अधिकाऱ्यांच्या मिलिभगतमुळे लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे

तालुका प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी यांची या गाळमाफी यांच्या सोबतची मिलीभगत असल्याने शासनाला हेच अधिकारी व कर्मचारी फसवत असून किती महसूल मिळतो व नियमानुसार किती गाळाची वाहतूक होते याचा हिशोब नसल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल यामुळे बुडत आहे.

कर्मचाऱ्याची नेमणूक करावी

हे गाळ माफिया नियमानुसार दररोज किती रॉयल्टी भरतात व किती टिप्पर अवैध गाळ वाहतूक करतात यातील गाळ हा शेतकऱ्यांसाठी किती प्रमाणात जातो का वीटभट्टी धारकच त्यावर डल्ला मारतात म्हणून जेवढी रॉयल्टी भरली आहे तेवढाच गाळ उपसा होतोय का यासाठी एक कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी अशी मागणी ही शेतकरी वर्गातून होत आहे.

# बुद्ध विहारात धम्माचे संस्कार करुन आदर्श समाज निर्माण करा - पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो

## भव्य रॅली काढून भिमराज नगर येथे बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा

प्रतिनिधी @ बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मातरांची घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपुर मुक्कामी तथागत बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागतांचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सम्यक सम्बुद्ध जयंती औचित्य साधून रविवार रोजी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो, पुज्य भिक्खु डॉ.इंदवंन्स महाथेरो, पुज्य भिक्खु चंद्रमुणी, पुज्य भिक्खु धम्मघोष, पुज्य भिक्खु पय्यावर्धन यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून भिमराजनगर राजुरीवेसपर्यंत बुद्ध मूर्तीची भव्य मिरवणूक काढून भीमराज नगर येथील विहारात बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली.पूज्य भिक्खु यांच्या वतीने उपासक- उपासिका यांना धम्मदेसना देण्यात आली.

बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापणा प्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, प्रा. प्रदीप रोडे, अमरसिंह ढाका,ड भगवान कांडेकर, गौतम चोपडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापना प्रसंगी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले की, डॉ.आंबेडकरांनी समाज बांधवाना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, सामाजिक शैक्षणिक,आर्थिक, व राजकीय प्रगतीसाठी क्रांती केली. बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्म क्रांती केली व दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागताचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्याची जबाबदारी सर्व आंबेडकरी अनुयायाची आहे. बुद्धांचे तत्वज्ञान आत्मसात करून तथागताच्या धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी दर रविवारी उपासक-उपासिका यांनी बुद्ध विहारात बुद्ध वंदना घेऊन बुद्ध धम्माचे अनुकरण करणे सर्वांची जबाबदारी आहे. शांतीने जगण्यासाठी बुद्धाच्या तत्वज्ञानाशिवाय पर्याय नाही. कारण जगाला युद्धाची नाहीतर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची गरज आहे.यावेळी राजू जोगदंड, रमेश गंगाधरे, किसन तांगडे, ड.सुरेश वडमारे, डी. जी.



वानखेडे, अरुणराव कागदे, विष्णु वाघमारे, रणजित क्षीरसागर, प्रशांत वासनिक, ड. तेजस वडमारे, प्रा. राम गायकवाड, बापू पवार, रमेशराव सोनवणे, मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, मिराताई कागदे, गयाबाई उजगरे, अलकाताई कांडेकर, अरुणाताई आठवले, संगीता वडमारे, ज्योतीताई वीर, उषाताई सोनवणे, कलावती गंगाधरे, शोभा जोगदंड, गवळण वडमारे, महेश आठवले, दयानंद उजगरे, नाना मस्के, विलास जोगदंड, भारत कांबळे, सुभाष तांगडे, भैय्यासाहेब मस्के, भैय्यासाहेब साळवे, अक्षय कोकाटे, शाम वीर, महेंद्र वडमारे, प्रभाकर चांदणे, महेंद्र कांबळे, मनोज बोराडे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, संजय हनवते, सोनू वडमारे, प्रभाकर जोगदंड, दिपक ओव्हाळ, बाळु कांडेकर, गौरी वडमारे, पप्पू साळवे, कपिल साळवे, नामदेव वाघमारे,संजय कागदे, अजिंक्य वडमारे, चिंटू वडमारे, समाधान जाधव यांच्यासह या कार्यक्रमास सामाजिक, राजकिय क्षेत्रातील मान्यवर तसेच उपासक- उपासिका उपस्थित होते.



# देऊळझरी येथे 'नमो नरहर'' च्या जयघोषात नृसिंह महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी

प्रतिनिधी @ जाफ्राबाद

जाफ्राबाद तालुक्यातील देऊळझरी येथील प्राचीन नरसिंह महाराज मंदिर परिसरात नरसिंह महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी बुद्धी शक्ती ची देवता म्हणूनही ज्याकडे पाहिले जाते .नरसिंहांच प्राचीन मंदिर व खास करुन संपुर्ण महाराष्ट्रात दुर्मिळ ठिकाणी असून यातील एक मंदिर देऊळझरी गावांतील पुर्णा नदी च्या तिरावर आहे.नरसिंह महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. नरसिंह महाराज कि जय, अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळेस महाआरती, महारुद्र अभिषेक आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मंदिराच्या वतीने पहाटेपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. फुलांनी सजविलेली पालखी भाविकांनी श्री नरसिंहला हार,पंचामृत आणि तेल वाहिले वाहत देऊळझरी गावात दीडशे वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने साजरा केल्या जाणाऱ्या नरसिंह जयंती उत्सवाची सांगता मोठया भक्तिमय वातावरणात झाली. दिवसभर याठिकाणी विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते व नंतर असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा अस्वाद घेतला.

नरसिंह महाराज मंदिर परिसर आजही भग्न अवस्थेत आहे. येथे लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज असल्याचे गावकरी मंडळींनी म्हटले.मंदिरासाठी एखाद्या सभामंडप देण्यात यावा अशी बर्याच दिवसांपासूनची मागणी गावकरी व मंदिर कमिटी अध्यक्ष नंदु साळवे उपअध्यक्ष पुरुषोत्तम भोपळे,प्रकाश ठेकेदार ,रामभाऊ आज्जा जयहारी महाराज ,बालाजी भोपळे,संतोष भुतेकर, प्रदीप भोपळे यांनी केली आहे

# चारठाण्यातुन चोरी गेलेली बोलेरो परभणीत आढळली

प्रतिनिधी @ चारठाणा

चाररठाणा बसस्थानक ते टि.पाईन्ट रस्त्यावर दुकाना शेजारी लावलेले महिंद्रा कंपनीची बोलरो गाडी अज्ञात चोरट्यांनी पळविल्याची घटना मंगळवार दि.६ रोजी रात्री दोनच्या सुमारास घडली होती. दरम्यान सदर गाडी परभणी येथील साखला फ्लाट परिसरातील इदगाह मैदान परिसरातील एका शेतात मिळून आली.





चारठाणा बसस्थानक ते टि.पाईन्ट रस्त्यावरील एका किराणा दुकाना शेजारी सोमवारी रात्री महिन्द्रा कंपनी ची बोलेरो गाडी क्रमांक एम. एच.४३ ए.एन.००३८ हे नेहमी प्रमाणे लावण्यात आली होती. मंगळवार रोजी सकाळी २.१७ वाजेच्या सुमारास घटनास्थळावरून वाहन पळविण्यात आले. सदर वाहनाचा जवळपास शोध घेण्यात आला. परंतु वाहनाचा कोठेच ठाव ठिकाणा लागला नाही. दरम्यान याच रस्त्यावर देशमुख हॉस्पीटल शेजारी हाजी इस्माईलखॉ पठाण याची टोयटा कंपनीची इटोज कार क्रमांक एम.एच २१ व्ही ९०५५ उभी होती. या कारच्या डोरलादेखील चोरट्यांनी छेडछाड केली. मागील हेडलाईट फोडले परंतु कारचे लॉक न तुटल्याने सदर चोरट्यांनी त्याचा मोर्चा महिंद्रा बोलेरो गाडीकडे वळविला व सदर वाहन पळविले होते. दरम्यान मंगळवारी सकाळी गाडी मालक पाशा इनामदार यांनी चारठाणा टि.पाईन्ट व देवगाव फाटा येथील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केला असता सदर वाहन चारठाणा येथून मंगळवारी रात्री सव्वा दोनच्या सुमारास सेलूच्या दिशेने गेल्याचे आढळून आली. गाडी मालक पाशा इनामदार यांनी बोलेरो गाडी चोरीला गेल्याची माहिती चारठाणा पोलीस ठाण्यात दिली होती. परतु या संदर्भात चारठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला नव्हता. दरम्यान परभणी येथील साखला फ्लाट परिसरातील इदगाह मैदान परिसरातील एका शेतात सदर वाहन बेवारस असल्याची माहिती त्या परिसरातील एका शेतकऱ्याने कोतवाली पोलीस ठाण्यात दिली होती.

दरम्यान कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कोपलवार, चालक शेख यांनी शनिवारी साखला फ्लाट परिसरातील घटनास्थळी भेट देऊन वाहन ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आण्यात आले होते. या घटनेची माहिती गाडी मालक पाशा इनामदार याना मिळाल्यानंतर त्यानी शनिवारी सायंकाळी कोतवाली पोलीस ठाणे गाठून घडलेला प्रकार पोलीसांना सांगितला दरम्यान पोलीसांनी चौकशी करून संबंधित वाहन ताब्यात दिले आहे.

# कर्तव्यदक्षते शिवाय जीवन सार्थकी नाही –डीवायएसपी विश्वंभर गोल्डे

प्रतिनिधी @ बीड

कठोर परिश्रमा शिवाय व संस्कारा शिवाय मनुष्य जीवन सार्थकि नाही असे मत बीड पोलीस दलाचे डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांनी महामार्ग पोलीस केंद्र मांजरसुंबा येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक रवींद्र किसनराव नागरगोजे हे पोलीस खात्यात यशस्वीरित्या व निष्कलंक सेवा करून दि. ३० एप्रिल २०२५ रोजी नियत वयोमानानुसार बीड पोलीस दलातून सेवानिवृत्त झाल्याबद्दल दि. १० मे २०२५ रोजी सायंकाळी नगर रोडवरील हॉटेल एम्पायर येथे सेवापुर्ती सोहळ्यात बोलताना व्यक्त केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, प्रशासकीय सेवा करत असताना, अनेक अडचणीला सामोरे जाताना ,कर्तव्यदक्षतेने कठोर परिश्रम घेऊन प्रमाणिक सेवा केल्यास निश्चितच आपले जीवन सार्थकी बनते म्हणूनच आज हे सभागृह पूर्ण भरलेले दिसून येत आहे .जीवनातील काही प्रसंग



विनोदी शैलीत सांगून सभागृह हास्य कल्लोळात नाहून निघाले. प्रमुख पाहुणे म्हणून वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा पोलीस दलाचे योग प्रशिक्षक डॉ. संजय तांदळे यांनीही आपले मनोगत थोडक्यात व्यक्त केले. रवींद्र नागरगोजे यांचे चिरंजीव संगमनेर येथे जलसंपदा विभागात अभियंता म्हणून कार्यरत असलेले सुरज नागरगोजे यांनी आपल्या आई वडिलांविषयी मनोगत व्यक्त करून वडिलावर कविता सादर करून सभागृहातअनेकांच्या डोळ्यात पाणी आणले. त्यांचा दुसरा मुलगा निखिल नागरगोजे केईएम हॉस्पिटल मुंबई येथे एमबीबीएस पूर्ण करून सध्या इंटरशिप करीत आहे त्याने देखील आपले मनोगत व्यक्त केले. रवींद्र नागरगोजे यांची मुलगी स्मिता पुणे येथे राहत असून त्यांचे जावई श्रीकांत आव्हाड हे मंत्रालयात कक्ष अधिकारी म्हणून सध्या कार्यरत आहेत. त्यांचे भाऊ मदन किसनराव नागरगोजे हे सहाय्यक फौजदार म्हणून औरंगाबाद ग्रामीण चिकलठाणा पोलीस स्टेशन येथे कार्यरत आहेत. हे देखील सेवापुर्ती कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. आघाव साहेब, मनोहर तांदळे, राम ढोबळे, माणिकराव तांदळे, परमेश्वर पौळ, श्रीकांत आव्हाड, मुकुंद तांदळे ,अच्युतराव तोंडे, थिटे साहेब, गोविंदकर देवा, रंजनाताई तांदळे ,स्नेहा नागरगोजे, श्रिया आव्हाड, आदिनीआपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी रवींद्र नागरगोजे यांचा सपत्नीक आई-वडिलांनी पुष्पहारणे सत्कार करून त्यांना आशीर्वाद दिला. व नंतर मातृभूमी प्रतिष्ठान च्या वतीने डॉ. संजय तांदळे व विजय जाधवर यांनी शाल ,सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. तसेच नातेवाईक व मित्र परिवाराने देखील पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.सूत्रसंचालन भिवराज कोकणे तर आभार मदनराव किसनराव नागरगोजे यांनी मानले. कार्यक्रमास चराठा गावातील प्रतिष्ठित नागरिक, नातेवाईक

# भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह- मेळावा संपन्न



प्रतिनिधी @ बीड

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी, बारावी वर्गातील विद्यार्थ्यांचा स्नेह-मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी शिक्षक नेते कल्याणराव वाघमारे हे होते.

आजच्या धकाधकीच्या युगात मित्रांच्या भेटी दुर्मिळ झाल्याने शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि आपल्या सवंगड्यांना भेटून हितगुज करण्यासाठी हॉटेल नीलकमल बीड येथे रविवार दि.११/५/२००५ रोजी कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथील सन २००७-०८या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेह-मेळावा संपन्न झाला. यावेळी आत्माराम बांगर, अरुण खाडे, गजानन आढावू, कल्याण करपे, अविनाश पोकळे, राजकर्ण घरत, ज्ञानोबा डोंगरदिवे, बिबीशन घायाळ, राजेंद्र करवंदे, सतीश बहीर आदींची प्रमुख उपस्थित होती.याप्रसंगी सोमीनाथ भोईटे अंकुश जाधव, मिलिंद धुताडमल, शितल राऊत, आशा जाधव, मोहन गव्हाणे ,सुनील खेत्रे, शकुंतला माने ,शुभांगी पाटोळे ,संपत गव्हाणे ,रंजीत जाधव, सर्वश्री बांगर ,खाडे ,करपे, पोकळे, घरत, घायाळ, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना कल्याणराव वाघमारे म्हणाले की,आजच्या विज्ञान युगात मुलाकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे आपण ज्या ठिकाणी आहोत त्या ठिकाणी विश्वास ठेवून काम केले पाहिजे. दिलेल्या ज्ञानाचा भरपूर उपयोग करा. ज्ञान द्या ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते आपल्या मुलांचे आवडीच्या क्षेत्रात करिअर करा. चांगल्या विचारांची देवाण-घेवाण करा चांगले काम करून विश्वास संपादन करा असे त्यांनी सांगितले.

यावेळी अविनाश दाभाडे, निखिल कानडे, रुद्रा कदम, शोभा मराठे, सुरेखा जगताप, लंका चव्हाण, मंदा काळे, शिवकन्या राऊत, रत्नमाला कबाडे, शेख रिना, नंदकिशोर फुलझळके, सचिन कांबळे, किशोर सुरवसे, विष्णू देवकर, विलास तळेकर, राजेंद्र दाभाडे, नारायण मुंजाळ गोविंद मुंजाळ, शाम तळेकर ,संजय वखरे, अमोल काळे, नितीन जाधव, अर्जुन धनवडे ,राम जाधव, बाबासाहेब जाधव, चक्रधर अनभूले, सुभाष भनगे, प्रशांत भोजगुडे, राहुल वाघमारे यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकुश जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन पल्लवी हाके यांनी केले शेवटी अविनाश दाभाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# हजारो भाविकांची उपस्थिती ; नृसिंह जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

प्रतिनिधी @ पोखर्णी नृसिंह

श्रीक्षेत्र पोखर्णी नृसिंह येथे नृसिंह जन्मोत्सव सोहळा रविवारी सायंकाळी ६ वाजून ४९ मिनिटांनी ' नरहरी शामराज की जय ' चा जयघोष गुलालाची उधळण ' फटाक्यांची आतिषबाजी करत हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भक्तसागर उसळला होता. मंदिर परिसर भक्तिमय झाला होता. आज ३० ते ४० हजार भाविकांनी देवतेचे दर्शन घेतले.

महाराष्ट्रातील एक जाज्वल्य दैवत म्हणून प्रसिद्ध असलेले श्रीक्षेत्र नृसिंह पोखर्णी महाराष्ट्रातील अनेक अनेक भक्तांचे श्रद्धास्थान कुलदैवत आहे या सोहळ्यानिमित्त केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर अनेक राज्यातून भाविक पोखर्णीत दाखल झाले होते. रविवारी सकाळपासून दर्शनासाठी गर्दी होती.

मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. भविकांची गर्दी लक्षात घेता पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नृसिंह जन्म सोहळयानिमित्त पंचक्रोशीतील सर्व महिला सासरच्या सर्व मंडळींना घेऊन माहेरी पोखरणी नृसिंह येथे नृसिंह जन्मोत्सव सोहळ्या निमित्त येतात या उत्सवात सहभागी होतात. यावेळी जिल्हाभरातील सर्व लोकप्रतिनिधी अधिकारी नागर कि मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ह भ प अच्युत महाराज दस्तापुरकर यांच्या देव जन्माच्या कीर्तनात ' खांबावरील लाथ मारीली दुर्जने ; स्तंभी नारायण प्रकटले.. असे म्हणताच सायंकाळी ६ वाजून ४९ मिनिटांनी सूर्य अर्धा वर आणि अर्धा मावळला असता ' नरहरी श्यामराज की जय ' चा जयघोष गुलालाची उधळण, ढोल ताशांचा गजर , फटाक्यांची आतशबाजी करत हजारो भाविकांनी जन्मोत्सव सोहळ्यात सहभाग नोंदवला.

नृसिंह जन्मोत्सव निमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी नृसिंह संस्थान च्या वतीने ४० हजार लाडू प्रसादाचे वाटप करण्यात आले. मंदिराच्या गाभाऱ्यात प्रसाद ठेवण्यात आला होता. दर्शन घेऊन जाणाऱ्या भक्तांना वाटप करण्यात आला असल्याचे संस्थांनचे अध्यक्ष एम. आर. वाघ यांनी सांगितले.

नृसिंह जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त मंदिरावर व परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रोषणाईच्या झगमगाटात मंदिर परिसर उजळून निघाला आहे. तर लहान बच्चे कंपनीसाठी रहाट पाळणे खेळणी व इतर व्यवसाईक पोखर्णीत दाखल झाले असून परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# वंचित बहुजन आघाडीची परभणीत तिरंगा रॅली

प्रतिनिधी @ परभणी

वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस स्वाभिमानी दिवस म्हणुन साजरा केला जातो यावर्षी सामाजिक उपक्रम राबवून तसेच भारतीय एकता आणि वीर सैनिकांच्या सन्मानसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तिरंगा रॅलीचे आयोजन केले होते.

भारत - पाकिस्तान युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांना व भारतीय एकता आणि वीर सैनिकांच्या सन्मानासाठी भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दि. ११ मे रोजी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात होते. ही तिरंगा रॅली शहरातील क्रांतीसुर्य महात्मा फुले स्मारक पासून निघून ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकापर्यंत काढण्यात आली. तिरंगा रॅली यशस्वीतेसाठी वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष (उत्तर ) तुकाराम भारती, दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील मगरे, महिला जिल्हाध्यक्षा सुनिताताई साळवे, जिल्हा महासचिव शिवाजी वाकळे, जिल्हा महासचिव गौतम रणखांबे, उत्तर युवक जिल्हाध्यक्ष गणेश गाढे, दक्षिण युवक जिल्हाध्यक्ष तुषार गायकवाड, तालुका अध्यक्ष (उ ) प्रमोद अशोकराव अंभोरे, तालुका अध्यक्ष (द) कमलेश ठेंगे, तालुका उपाध्यक्ष यशवंत सोनवणे, तालुका महासचिव राहुल पवळे, शहराध्यक्ष रंजीत मकरंद, युवक शहराध्यक्ष प्रमोद कुटे, युवा जिल्हा सचिव प्रा.



बालासाहेब गाढे, जिल्हा सचिव युसुफ कलीम भाई, कार्यकर्ते संदीप खाडे, जेष्ठ कार्यकर्ते भीमराव वायवळ, दीपक पंचांगे, मोहन गाढेआदींनी परिश्रम घेतले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष अशोक कांबळे, कुंदन ठाकूर, सतीश वाकळे, प्रताप पंडित, सुरज गायकवाड, अमोल वाघमारे, बापूराव मोरे, प्रकाश टेकूळे, प्रकाश अंभोरे, रवी खिल्लारे, रामसिंग अंभोरे, शिवाजी कोकाटे, युनुस कच्ची, महेंद्र सानके, संजय वाघमारे, वंचित बहुजन आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# भव्य राज्यस्तरीय कवीसमेंलन

प्रतिनिधी @ लातुर

सम्राट अशोक साहित्य व सांस्कृतिक मंच लातूर,महाराष्ट्र राज्य व्दारा आयोजित,बुध्द जयंती व संस्थापक अध्यक्ष लेखक प्रमोद उबाळे सर यांच्या वाढदिवसानिमित्त पहिले नवोदितांचे खुले भव्य राज्यस्तरीय कवीसंमेलन होत आहे.

साहित्य मध्ये बुध्द विचार पेरण्याचे कार्य मा.प्रमोद उबाळे सर हे करीत आहेत त्याकरीता महाराष्ट्रातील नवोदित निमंत्रित कवी,कवित्री यांना आवाहन करून युध्द नको बुध्द हवा. या विषयावर राज्यस्तरीय कवीसंमेलन १८ मे ला रविवारी हॉटेल उदयश्री हे उषा किरण टॉकिज दयानंद कॉलेजसमोर बार्शीरोड लातूर, परिसर येथे आयोजित केले. त्यासाठी बर्याच कवी, कवित्रिंनी नाव नोंदणी केली आहे.संमेलनाचे अध्यक्ष म्हणून मा.ऍड.गझलकार ज्येष्ठ कवी विजयकुमारजी कस्तुरे सर आहेत. बरोबर उपस्थित डॉ.डी.बी.खरात सर, डॉ.बबनराव महामुने, अंकुश पडधान, चिखली. प्रा.शिवशरण हावळे सर, मा.रमेश हनमंत सर, प्रा.पंढरी बनसोडे सर, मा.दयानंद सिरसाठे, प्रा.प्रधान ढवारे सर, मा.अशोक ईडेकर इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार असून सर्वांच्या कविता सादरीकरण झाल्यानंतर कवी व कवित्रिंना सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात येईल. कविसंमेलनाचे सुत्रसंचालन ऍड.उमाकांत आदमाने सर पुणे हे करणार आहेत तर कार्यक्रमाचे आभार प्रधान ढवारे सर करतील.

# नुतन पदाधिकाऱ्यांना आ. रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते नियुक्त पत्र वाटप

प्रतिनिधी @ परभणी

पूर्णा तालुक्यातील नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली असून आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले.यावेळी युवक तालुका उपाध्यक्षपदी वैभव काळे व सुदर्शन ढोणे, एरंडेश्वर युवक पंचायत समिती सर्कल अध्यक्षपदी विनायक स्वामी, वझुर जिल्हा परिषद सर्कल युवक अध्यक्षपदी प्रल्हाद कोळेकर, देऊळगाव युवक पंचायत समिती सर्कल अध्यक्षपदी बेलाजी वाघमोडे, एरंडेश्वर युवक जिल्हा परिषद सर्कल अध्यक्षपदी परमेश्वर गलांडे, गौर युवक जिल्हा परिषद सर्कल



अध्यक्षपदी मंगेश कराळे, गौर युवक पंचायत समिती सर्कल अध्यक्षपदी दिगंबर कदम, धानोरा मोत्या युवक पंचायत समिती सर्कल अध्यक्षपदी ऋषिकेश मोहिते, फुलकळस युवक पंचायत समिती सर्कल अध्यक्षपदी पशुपती शिराळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. गंगाखेड विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्यात कार्यरत असलेल्या गुट्टे काका मित्रमंडळाच्या कार्यकारी निवड समितीने पूर्णा तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड केली आहे. .

निवड झालेले सर्व पदाधिकारी आपल्याला दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडतील. तसेच भविष्यात संघटनेच्या वाढीसाठी बहुमोल असे योगदान सुद्धा देतील. संघटनेच्या कामांसह सामाजिक बांधिलकी जोपासून विविध उपक्रम राबवतील, असा मला विश्वास आहे. असे मत आ. गुट्टे यांनी व्यक्त केले.यावेळी मित्र मंडळाचे प्रवक्ते संदीप माटेगावकर, विकासराव गव्हाळे, संभाजी मोहिते, प्रकाश भंडे, उद्धव शिंदे, दीनानाथ दुधाटे, प्रकाश फुलवरे यांच्यासह मित्रमंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# किराणा दुकानातून ३७ हजारांचा गुटखा जप्त

प्रतिनिधी @ ताडकळस

ताडकळस पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंगळी येथील एका किराणा दुकानावर पोलीस पथकांनी केलेल्या कारवाईत ३७ हजार ७२० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे याप्रकरणी ताडकळस पोलीस ठाण्यात दोन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून दुकान मालकास ताब्यात घेतले आहे. स्थानिक गुन्हा शाखेचे पथक रविवार ११ मे रोजी ताडकळस पोलिसांच्या हद्दीतील पिंगळी परिसरात गस्तीवर असताना गावातील एका दुकानातून अनाधिकृतपणे राज्य



सरकारने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची विक्री होत असल्याची माहिती मिळाली या माहितीच्या आधारे पथकाने किराणा दुकानात धाड टाकली असता या ठिकाणी वेगवेगळ्या कंपनीच्या गुटख्याचचे पुडे आढळून आले यासंदर्भात पोलीस पथकाने चौकशी करून माहिती घेतली यात एकूण ३७ हजार ७२० रुपयांचा गुटखा पथकाने जप्त केला याप्रकरणी ताडकळस पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ११९/ २०२५ मध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५, ३ (५) सह अन्नसुरक्षा मानके कायदा २००६ चे कलम ५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात

# वनामकृवितील विद्यार्थ्याची नेपाळच्या काठमांडू विद्यापीठात निवड




प्रतिनिधी @ परभणी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील कृषि यंत्र व शक्ती अभियांत्रिकी विषयात आचार्य पदवीचे शिक्षण घेत असलेले इंजि. विशाल दशरथराव काळबांडे यांची निवड नेपाळ देशातील काठमांडू विद्यापीठात लघुकालीन संशोधन अभ्यासक म्हणून झाली आहे.

या उल्लेखनीय निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. इन्द्र मणि, संचालक शिक्षण डॉ. भगवान आसेवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल रामटेके, तसेच कृषि यंत्र व शक्ती अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. गोपाळ शिंदे यांनी इंजि. विशाल काळबांडे यांचे अभिनंदन करून पुढील संशोधनासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# पूर्णेत तिरंगा रॅली भारतमातेचा जयघोष ;शहीदांना अभिवादन

प्रतिनिधी @ पुर्णा

शहरात भारतीय सैन्याच्या शौर्याचा जयजयकार करण्यासाठी काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीत भारतमातेचा जयघोष करीत युद्धात विरमरण आलेल्या शहीदांना साश्रू नयनांनी श्रध्दांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.भारत-पाक युद्धामध्ये भारतीय सैन्याने जे शौर्य गाजवले ज्या जवानांना विरगती प्राप्त झाली.त्यांना अभिवादन करण्यासाठी पूर्णेत शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख विशाल कदम यांनी रविवारी ११ मे रोजी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन केले होते. याप्रसंगी शेकडो तरुण आपल्या दुचाकीस तिरंगा लाऊन हजर होते.ही रॅली झिरो टी पाईन्ट पासुन आनंद नगर चौक, महात्मा बसवेश्वर चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक,हजरत मस्तानशहावली दर्ग्यात अभिवादन करुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास



पुष्पहार अर्पण करून युद्धात विरमरण आलेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी भारत माता की जय घोषणेने परिसर दणाणून गेला होता.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विशाल कदम यांच्या सह डॉ. विनय वाघमारे, अँड .विशाल किरडे, जगदीश जोगदंड, लक्ष्मीकांत शिंदे,मा.सैनिक मन्नूसिंह ठाकूर , डॉ. गुलाब इंगोले, गणेश कदम,सुनील शिंदे, अंकित कदम,पंपटवार सर, दत्ता कदम, सचिन कदम,राम भालेराव ,अजय एकलारे,केशव कदम, कैलास मुळे अक्षय कहाते,सह शेकडो कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.असंख्य नागरिकांसह शिवसेना कार्यकर्त्यांची




# शहागड चा भुमि पुत्र महेश चोथे बनला परिवहन अधिकारी

प्रतिनिधी @ शहागड

अबंड तालुक्यातील शहागड येथील रहिवाशी महेश चोथे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत नुकतीच सहाय्यक वाहतूक परिवहन अधिकारी म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या यशाबद्दल वडील चंद्रकांत चोथे, भाऊ गणेश चोथे यांनी त्यांचे कौतुक केले. तर गावकऱ्यांनी त्यांचा सत्कार करीत ढोलताशाच्या गजरात त्यांची गावातून मिरवणूक काढली. यावेळी गावातील सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक नजीर शहा एकबाल बागवान व गावकरी मंडळी उपस्थिती होती.



## लोहगाव येथे वादळी वाऱ्यामुळे केळीच्या बाग उद्धस्त

प्रतिनिधी @ परभणी

परभणी जिल्ह्यात अवकाळी पावसाने थैमान घातले असून लोहगाव येथे वादळी वाऱ्यामुळे केळीच्या बाग उद्धस्त झाली असून वादळी वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. येथील शेतकरी राजेभाउ सखाराम देशमुख यांच्या केळीच्या बागेचे नुकसान झाले असून एकूण ४००० झाडे लागवड केले होते. दि ५ मे रोजीच्या वादळी वाऱ्यामुळे सर्व केळीची झाडे घाली पडले असून फक्त १०० झाले शिल्लक राहिले आहे. शासनाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर झालेल्या नसकानाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी आशा व्यक्त करत शेतकरी राजेभाउ सखाराम देशमुख यांनी अशी शासनाकडे विनंती केली आहे.

# चार जवान कर्तव्यावर हजर होण्यासाठी परभणीतून रवाना




प्रतिनिधी @ परभणी

भारत आणि पाकिस्तान यांच्यात गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या हल्ले - प्रतिहल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर परभणी जिल्ह्यात सुटीवर आलेले चार जवान कर्तव्यावर हजर होण्यासाठी रविवारी (दि.११) सचखंड एक्स्प्रेसने रवाना झाले.

याप्रसंगी जवानांना निरोप देण्यासाठी डॉ.रामेश्वर नाईक यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने रेल्वे स्थानकावर आले होते. सैनिक रणजीत पवार (नेमणूक - काश्मीरमध्ये राजुरी सेक्टर रा. दैठणा), राठोड रोहिदास नाईक (इसार, रा. गंखाखेड), सईद फिरोज सईद मुसा(पठाण कोट रा.जांब) आणि देवफळे या चार जवानांचा सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.

# बुद्ध जयंतीनिमित्त परळीत भव्य धम्म रॅली धम्मदेसनेचे आयोजन

## सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – आयु. हनुमंत वाघमारे यांचे आवाहन

प्रतिनिधी @ परळी

भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त १२ मे २०२५ रोजी बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ शहरात भव्य धम्म रॅली आणि धम्मदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत असून, परळी शहरासह तालुक्यातील सर्व बौद्ध बांधवांनी आणि धम्मप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष आयु. हनुमंत वाघमारे यांनी केले आहे.

या दिवशी सायंकाळी ६ वाजता राणी लक्ष्मीबाई टॉवर येथून भव्य धम्म रॅलीला प्रारंभ होणार असून ती मोंढा मार्केट मार्गे पुढे जाऊन परळी शहरातील रेल्वे स्थानक परिसरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापाशी समाप्त होणार आहे. रॅली दरम्यान डॉ. बाबासाहेब



आंबेडकर आणि भगवान बुद्ध यांचे संदेश देणारे फलक, धम्मचक्र ध्वज आणि अनुयायांची शिस्तबद्ध उपस्थिती या रॅलीला विशेष आकर्षण देणार आहे.

रॅलीच्या समारोपानंतर रेल्वे स्थानक येथील मोठ्या मैदानावर धम्मदेशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात पूज्य भिक्खु रेवतबोधी यांचे धम्मदेशना होणार असून ते भगवान बुद्धांच्या करुणा, अहिंसा आणि समता या तत्वांवर आधारित मार्गदर्शन करतील. त्यांच्या धम्मदेशनातून समाजप्रबोधनास चालना मिळेल आणि युवकांमध्ये नैतिकतेचे भान जागृत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या निमित्ताने संपूर्ण परळी शहरात बुद्धमय वातावरण निर्माण होणार असून, बौद्ध बांधवांसाठी ही एक ऐतिहासिक आणि प्रेरणादायी संधी आहे. धम्म रॅली व धम्मदेशन कार्यक्रम शांततेच्या वातावरणात पार पडावा आणि समाजात एकोपा व बंधुभाव वाढावा, यासाठी आयोजकांकडून सर्व स्तरातील नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे परळी तालुकाध्यक्ष आयु. हनुमंत वाघमारे यांनी केले आहे.

# राजश्री मुंडे यांना पीएच.डी. प्रदान

प्रतिनिधी @ मानवत

येथील राजश्री भास्करराव मुंडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएचडी पदवी प्रदान केली आहे.राजश्री मुंडे यांनी राज्यशास्त्र विषयात संशोधन केले असून पंकजा गोपीनाथ मुंडे, राजकीय नेतृत्व: एक अभ्यास या विषयावर त्यांनी शोध प्रबंध सादर केला. देवगाव रंगारी येथील आसाराम भांडवलदार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले. मुंडे यांनी राज्यशास्त्र विषयात एम. फिल. पूर्ण केले असून सहा.प्राध्यापक पदासाठी राज्य पात्रता परीक्षेमध्येही (सेट) यश संपादन केले आहे. के. के. एम. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे यांच्या त्या कन्या आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयकुमार कत्रुवार, उपाध्यक्ष अनिलराव नखाते, सचिव बालकिशनजी चांडक,



कोषाध्यक्ष रामचंद्रराव कत्रुवार, सहसचिव विजयकुमार दलाल, संचालक दिलीपराव हिबारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक वरिष्ठ प्राध्यापक डॉ. बाबासाहेब डोळे, प्र-कुलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप, माजी संचालक डॉ. भारती गवळी, राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक व विभाग प्रमुख डॉ. सुजाओद्दीन शाकीर, डॉ. पंडित लांडगे, प्रसाद जोशी



# गुट्टे काका मित्र मंडळाच्या वझुर सर्कल अध्यक्षपदी प्रल्हाद कोळेकर यांचे निवड झाल्याबद्दल ताडकळस येथे सत्कार

प्रतिनिधी @ ताडकळस

आ.डॉ.रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळाच्या वझुर सर्कल च्या अध्यक्षपदी प्रल्हाद कोळेकर यांची निवड झाल्याबद्दल गुट्टे काका मित्र मंडळाचे ताडकळस शहराध्यक्ष प्रकाश फुलवरे यांच्या वतीने त्यांचा ताडकळस येथे सत्कार करण्यात आला .यावेळी आ.डॉ.रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळाचे युवा शहराध्यक्ष कन्हैया धुळगुंडे ,युवा तालुका संघटक दत्ता धनवटे यांच्यासह आदी उपस्थिती होते.



# इथूनपुढे दहशतवादी हल्ल्याला युद्ध समजले जाईल

## भारताचा पाकला थेट इशारा

नवी दिल्ली_ दहशतवादाच्या संदर्भात भारताने मोठा निर्णय घेतला आहे. भविष्यातील कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल. त्यानुसार त्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे.

भारताचं पाकला चोख प्रत्युत्तर

पाकिस्तानने शनिवारी पहाटे देशाच्या पश्चिम सीमेला लक्ष्य केले. त्यांनी भारताच्या लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्यासाठी ड्रोन, लांब पल्ल्याची शस्त्रे, युद्धसामग्री आणि लढाऊ विमानांचा वापर केला. पण भारताने त्याला चोख प्रत्युत्तर देत त्याचे सर्व हल्ले यशस्वीरित्या परतवून लावले. या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी पश्चिम सीमेवरील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान आणि तिन्ही दलांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यापूर्वी, चौहान यांनी सिंह यांना सुरक्षेच्या परिस्थितीची माहिती दिली.

भारत – पाकिस्तान शस्त्रसंधी करुन चर्चा करणार


जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी २७ हिंदू पर्यटकांची पाकिस्तानी दहशतवाद्यांनी टार्गेट किलींग केल्यानंतर भारताने ७ मे रोजी पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक केली. त्यानंतर गेल्या ३ दिवसांपासून भारत आणि पाकिस्तानात ड्रोन आणि मिसाईल हल्ले सुरू होते. भारताने पाकिस्तानचे सर्व हल्ले यशस्वी परतवून लावले. दरम्यान दोन्ही देशांमधील वाढता तणाव पाहता अमेरिकेने दोन्ही देशांमध्ये वाढता तणाव पाहता अमेरिकेने दोन्ही देशांमध्ये मध्यस्थी केली. अमेरिकेने पाकिस्तानच्या राजकीय नेतृत्वाला बाजुला सारत पाकिस्तानचे डायरेक्टर जनरल ऑफ मिल्ट्री ऑपरेशन्स (डीजीएमओ) यांच्याशी चर्चा केली.

अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर पाकिस्तान शस्त्रसंधीसाठी तयार झाला. दरम्यान या शस्त्रसंधीला स्वीकृती देताना भारताने महत्त्वाची अट टाकली. भविष्यातील कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल. त्यानुसार त्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. त्यानुसार दोन्ही देशांमध्ये आज, शनिवारी संध्याकाळी ५ वाजेपासून शस्त्रसंधी लागू करण्यात आली आहे.

# पाचोड परिसरात निवृत्त न्यायालय कर्मचाऱ्यांचे धड सापडले सर्वत्र खळबळ

प्रतिनिधी । गेवराई

पैठण तालुक्यातील चिंचाळा शिवारातील विहिरीत मुंडके नसलेला एका व्यक्तीचा मृतदेह शुक्रवारी सकाळी ९ वाजता आढळून आल्याने परिसरामध्ये खळबळ माजली होती . नामदेव एकनाथराव ब्रह्मराक्षस (ब्रह्मा ) वय वर्ष ६४ वर्ष रा . छत्रपती संभाजी नगर हल्ली मुक्काम चिंचाळा तालुका येथे भावाच्या घरी राहात होते . शेतीचा कामासाठी ते चिंचाळा येथे येत असत . गुरुवारी ते घरी न आल्याने सर्वत्र शोधाशोध करून पाहिली . मात्र सकाळी ९ वा त्यांचा शीर नसलेला



मृतदेह आढळला . पैठण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नामदेव ब्रह्मराक्षस हे गेवराई येथील न्यायालयामध्ये लिपिक म्हणून कार्यरत होते . २०१८ साली ते सेवानिवृत्त झाले होते . त्यानंतर ते आपल्या गावी चिंचाळा या ठिकाणी राहण्यासाठी आले . त्यांची चिंचाळा शिवारात गट नंबर १२१ मध्ये शेती आहे . छत्रपती संभाजीनगर येथे त्यांनी घर बांधले आहे . त्यांचा एक मुलगा वकील ,दुसरा मुलगा नोकरी करीत आहे. सेवानिवृत्तीनंतर नामदेवराव सेलू मानवत येथे आपल्या मुलीकडे बरेच दिवस राहत होते. शेतीच्या कामासाठी छत्रपती संभाजीनगर वरून चिंचाळा तालुका पैठण येथे ते आपल्या बंधू कडे पत्नीसह राहत होते. शुक्रवार दिनांक ९ रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्याच शेताजवळ त्यांचे मुंडके नसलेला मृतदेह आढळून आला होता . घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह ,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पैठणचे पोलीस निरीक्षक संजय देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे पाटील, जमादार किशोर शिंदे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला. त्यानंतर गावकऱ्यांच्या मदतीने पोलिसांनी मृतदेह विहिरीतून बाहेर काढला. त्यानंतर हा मृतदेह ब्रह्मराक्षस यांचाच असल्याचे समोर आले. याप्रकरणी पाचोड पोलीस ठाण्यात सध्यातरी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे .एकनाथराव ब्रह्मराक्षस हे गेवराई येथील न्यायालयात काम करीत असताना सर्वांमध्ये ते प्रिय झाले होते .त्यांचा सुस्वाभाव व शांतपणा यामुळे ते सर्वांना आपलेसे वाटत होते .

# धारूर येथील संभाजीनगर मध्ये संभाजीराजे जयंती निमित रक्तदान शिबिर

## तरुणाची शक्ती चांगल्या कार्यासाठी एकवटली

प्रतिनिधी । धारूर

किल्ले धारूर येथील संभाजीनगर मध्ये राजे संभाजीमहाराज यांची जयंती सामाजिक उपक्रमाने साजरी करण्यात आली त्यात रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, महाप्रसाद असे उपक्रम घेण्यात आले. यावेळी चांगल्या कार्यासाठी तरुणांची शक्ती एकवटल्याचे दिसून आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष डॉ स्वरूपसिंह हजारी, माजी नगराध्यक्ष अर्जुन बप्पा गायकवाड, सरपंच राजेश सोनवणे ,डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ मयुर सावंत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष नितीन भैय्या शिनगारे, नगरसेवक बालाजी चव्हाण, प्रदीप नेहरकर, सुरेश सावंत, बालरोग तज्ञ नवनाथ चव्हाण ग्रामपंचायत सदस्य गजानन किर्दक ,पत्रकार संघाचे अध्यक्ष अतुल शिनगारे, पत्रकार सुनील कावळे ,संपादक सतीश



पोतदार, रवी गायसमुद्रे, शुभम शुक्ला, गंगाधर वाले, ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत भांगे, ड मोहन भोसले , कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य संदीप शिनगारे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शिबिराच्या उद्घाटनंतर वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. तब्बल १०० वृक्ष लावून ते जोपासण्याची शपथ तरुणांनी घेतली. सर्वांसाठी जयंती निमित्त महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते. यावेळी संभाजीनगर येथील सर्व तरुण व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी प्रतिमापूजन करून घोषणाही देण्यात आल्या. सामाजिक उपक्रमाने छत्रपती संभाजी राजेंची जयंती साजरी होत असल्याने मान्यवरांनी येथील तरुणांची कौतुक केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास बोरगावकर यांनी केले तर आभार रोहित गायकवाड यांनी मानले.




# वंचितच्या वतीने पाटोद्यात तिरंगा रॅली

प्रतिनिधी । बीड

भारताची एकता आणि भारताचे वीर सैनिक यांच्या सम्मान करत तिरंगा रॅली बीड जिल्हा पाटोदा येथे काढण्यात आली आज ११ मे रोजी वंचित बहुजन आघाडी वतीने निर्दोष भारतीय पर्यटकों की जान जाने और भारतीय सशस्त्र बलों के बलिदान और वीरता को याद और सम्मान करने के लिए पूरे महाराष्ट्र में तिरंगा रैली छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बाबासाहेब आंबेडकर चौकात काढत आज पाटोदा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अजय सरवदे, ज्ञानेश्वर कवठेकर, उमेश तूळवे, उपाध्यक्ष सचिन मेघडबर ,तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड , राहुल शिरोळे ,सिद्धार्थ आगे, आप्पासाहेब देवडे, गणेश पोळ, महेश वाघमारे, मयूर थोरात, सुनील बनसोडे, राहुल बनसोडे बाबासाहेब जावळे,सतीश इनकर ,आदी प्रामुख्याने उपस्थित होते

# राज्यातील नगरपरिषदा, आणि नगरपंचायतमधील कामगार , कर्मचारी २० मे रोजी राज्यातील सर्व जिल्हा अधिकारी कार्यालयांवर मोर्चा काढणार

## २६ मे २०२५ पासुन राज्याचे मुख्य संघटक श्री संतोष पवार व रामदास पगारे हे मरेपर्यंत आमरण उपोषणास बसणार

प्रतिनिधी । जिंतुर

महाराष्ट्रराज्य नगरपरीषद, नगरपचायंत कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने हे आदोलन करण्यात येणार आहे राज्यसरकार नगरपरिषद कर्मचाऱ्यांना नेहमीच त्याचा हक्कापासून वंचित ठेवीत आहे त्याना वेळेवर पगार दिला जात नाही सहाय्यक अनुदान तिन तिन महीने उशीरा दिला जातो त्या मुळे नगरपरिषदेतील स्वच्छता कामगाराना अनेक समस्या समोर जावे लागत आहे नगरपरिषद मधील कर्मचारी व कामगार नागरीकांच्या दैनदिन सर्व समस्यांच्या निपटारा करतात परंतू त्यांनाच पगारी साठी आदोलनाचे



हत्यार उचलावे लागते हे दुर्दैव आहे.

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या कर्मचाऱ्याच्या मागण्या आजपर्यंत पूर्ण करण्यात आल्या नाही वांरवार निवेदने , लाँगमार्च, मोर्चे काढून सुद्धा राज्यसरकला जाग येतनसल्यामुळे कर्मचऱ्यानी एकजुटीने निर्णय घेतला असुन येत्या २० मे रोजी राज्यातील सर्व जिल्हाअधिकारी कार्यालयावर कर्मचारी मोर्चे काढणार असून तसेच दिनांक २६ मे २०२५ पासून राज्यसंघटक संतोष पवार व रामदास पगारे हे आजाद मैदान मुंबई येथे मरे पर्यंत आमरण उपोषणाला बसणार आहेत प्रमुख मागण्या १) कामगार व कर्मचाऱ्याचे मोठ्या प्रमाणात प्रश्न सोडविण्यात प्रमुख भुमीकेत असणारे कामगार नेते श्री संतोष पवार व उत्तर महाराष्ट्र चे कामगार नेते रामदास पगारे यांच्यावरील व इतर प्रतिनिधीवर द्वेषापोटी, सुडबुद्धी, हेतूपुरस्सर पणे केलेली कार्यवाही परत घेणे .

२) राज्यातील सर्व नगरपरीषदा, नगरपचायंत याना वेळेवर पगार देण्याची व्यवस्था करणे ३) राज्यातील नगरपरिषद मधील कर्मचायाना १०-२०-३० आश्वासीत प्रगतीयोजना चा लाभ देण्यात यावा.राज्यातील नगरपरीषद नगरपचायंत मधील कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम करणे समान कामाला समान वेतन देणे हत्यादी अनेक स्थानिक पातळीवरील मागण्यासोबत हे आंदोलन करण्यात येणार आहे असे राज्य मुख्य संघटक श्री संतोष पवार यांनी कळविले आहे